# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/10/2021 (बुधवार)

---

### —: घरफोडी :—

पो.स्टे. कटोल :— अंतर्गत 15 कि.मी. अंतरावरील मौजा मसली येथील निवासी नामदेव चंपतराव चौरे हे दिनांक 11.10.21 रोजी आपले घराला कुलुप लावून शेतात कामाला गेले असता 15.00 ते 15.30 वा दरम्यान मसली येथील निवासी रविन्द्र वारखेडे यांनी नामदेव चौरे चे घरात जावुन कीचन रूम मध्ये ठेवलेला जर्मन चे डब्यातील एक छोटी पर्स ज्यामध्ये 1) चांदीचे तोरडी 35 ग्रॅम कि 2.885 रू 2) विक्रेती पोत की 100 रू 3) नगदी 15,750 रू असा एकुन 18,335/— रू. माल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामदेव चंपतराव चौरे वय 49 वर्ष रा मसली ता. काटोल चे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी रविन्द्र रमेश वरखेडे वय 21 रा. मसली विरुध्द पो.स्टे. काटोल येथे अप क्रमांक 526/21 कलम 454, 380 भादवि दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोना आगरकर मो. न. 8421287310 हे करित आहे.

### —: चोरी दर्गातुन :—

पो.स्टे. देवलापार :— अंतर्गत 10 किमी अंतरावरील मोरफाटा येथील रहमत अली दर्गा हे दिवसात उघडे असते या दर्गात कोणतरी इसमांनी आत प्रवेश करुन आत मध्ये ठेवलेली दान पेटी मधील अंदाजे 1500/रू. व चिल्लर पैसे आणी काही नोटा दानपेटीसह चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी निकलेष टिकारामजी ठवकर रा. हिवरा बाजार चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. देवलापार येथे अप क्रमांक अप क्र. 162/21 कलम 454,380 भादवी भादवी दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. पुढील तपास पोना दिलीप टेकाम मो नं. 9764933554 हे करित आहे.

### —: दुखापत —

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :— अंतर्गत 3 किमी अंतरावरील आर व्ही.इन्फ्रास्क्चर कंपनी आहे सदर कंपनीत बुध्दपाल नागोराव वाहने वय 30 वर्ष रा कळंबा ता काटोल जि नागपूर व कृष्णा उर्फ कन्हैया रा. ओरिसा हे दोन्ही सदर कंपनीत कार्य करत असून एकाच रूम मध्ये राहत होते. दि. 08/09/21 चे रात्री 09.00 वा. दर. यातील कृष्णा उर्फ कन्हैया हा बुध्दपाल नागोराव वाहने चे पैसे चे पॉकेट चिवडत असता त्यांनी त्याला` टोकून त्यास दुस—या रूम मध्ये सामान घेवुन जाण्यास सांगुन झोपला. रात्री 23.30 वा दर. कृष्णा उर्फ कन्हैया ने बुध्दपाल नागोराव वाहने तोंडावर लाकडी पाटीने मारून, डोक्याच्या भारावर खाली पाडुन जख्मी केले यात बुध्दपाल नागोराव वाहने दात पाडले.

सदर प्रकरणी दिनांक 12/10/2021 रोजी मेडीकल कॉलेज नागपूर येथून प्राप्त एम.एल.सी. रिपोर्ट व बुध्दपाल नागोराव वाहने चे मालकाचे रिपोर्ट वरुन आरोपी कृष्ण उर्फ कन्हैया मो 9307840694 रा ओरिसा चे विरुध्द पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अप क्रमांक 0265/2021 कलम 326,324,325 भादवी दाखल करण्यात आला असून पुढील तपास सफौ अशोक तलमले हे करित आहे.

### —: जनावरांच्‍ कत्तलीसाठी अवैध वाहतुक :—

पो.स्टे. नरखेड :— दि 11/10/2021 रोजी पो.स्टे. नरखेड चे दत्तात्रय कोल्टे हे आपल्या सहकारी सह विभागीय गस्त करिता असता मौजा मोवाड येथील बस स्टॅाप चौक येथे वाहने चेकीं करीत असतांना मोवाड ते पांढुर्णा रोडनी समोरून एक मोठे वाहन येतांना दिसले. टाटा कंपनीची 10 चक्का कंटेनर ज्याचा क्रमांक यु पी 11 बीटी 4767 वाहन थांबवुन त्याची टॉर्च लावुन दार उघडुन तपासणी केली असता त्यामध्ये काळया रंगाच्या म्हैस जातीचे

जनावरे त्यांच्या तोंडाला, गळयाला व पायाला दोरीने बांधुन त्याना कोंबुन ईजा पोहचेल व ते गुदमरून मरतील अश्या स्थितीत वाहतुक करतांना मिळुन आले. **07 म्हैस जातीचे काळे रंगाचे जनावरे व 28 मैस जातीचे रेडे (हेले) असे एकुण 35 मैस जातीचे जनावरे प्रत्येकी अंदाजे किंमती 60,000/— प्रमाने 21,00,000/— चे जनावरे वाहतुक करण्यासाठी वापरलेला टाटा कंपनीचा 10 चकका कंटेनर क्र युपी/11 बीटी 4767 कि. 14,00,000/— असा एकुन 35,00,000/रु चा माल** जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी सर तर्फे पोशी/2282 राजकुमार मोगली सात्तुर पोस्टे नरखेड चे लेखी रिर्पोट वरुन वाहन चालक व त्यांचे सहकारी 1) अकरम शेख अब्दुल शेख जबलपुर 30 वर्ष रा जबलपुर (म प्र) 2)समिम खान सुलतान खान खान वय 35 रा भरवेली बालाघाट (म प्र) 3)साहील नवाब अन्सारी वय 20 रा बापपत (उ प्र) 4)समिर मोहम्मद समीर अन्सारी वय 24 रा जबलपुर (म प्र) यांचे विरुध्द पो.स्टे. नरखेड येथे अप क्रमांक 258/21 कलम प्राण्याचा छळ प्रतिबंध अधि 1960 कलम 11(1)(डी),मो वा अधि 83, मो वा अधि 177 दाखल करण्यात आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोउपनी दत्तात्रय कोल्टे पो स्टे नरखेड मो क्र 88054 48417 हे करित आहे.

## —: अकस्मात मृत्यु :—

पो.स्टे.खापरखेडा :— अंतर्गत 03 किमी अंतरावरील मौजा वारेगांव येथुन वाहणारी कोलार नदीत दिनांक12/10/2021 रोजी सकाळी मोहम्मद नईम मोहम्मद सुब्राती अन्सारी वय 32 वर्ष रा. पिली नदी शिवनगर नागपुर हा नागपुर येथील कलाम अन्सारी सेठ यांचे कारखान्यात काम होता काराखाण्याची विद्युत बंद झाल्याने कारखान्यातील साथीदारांसोबत येथे मासे पकडयाकरीता गेला होता या दरम्यान तो नदीत आंघोळ करिता नदीत उडी मारल्याने नदीच्या पाण्यामध्ये बुडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी मोहम्मद कलीन मोहम्मद सुब्राती अन्सारी वय 32 वर्ष रा पिली नदी शिवनगर नागपुर चे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे अ.मृ.क्र. 55/2021 कलम 174 जाफौ अन्वये प्रकरण नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोना दिपक रेवतकर मो नं 9545523736 हे करित आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर